अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची शपथेवर साक्ष

मी शपथपुर्वक निवेदन करतो कीः

माझे नावः महादेव गणपत भगत,

वयः ५५ वर्षे, व्यवसायः शेती,

राहणारः विरझोली, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत सुरु.**

०१. दि.०६.०९.२०२२ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. सदर दिवशीचे पंचनाम्यावर माझी सही आहे. परंतू त्यातील मजकूर मला माहिती नाही.

**साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०६.०९.२०२२ रोजी पोलीसांनी मला व दुसरा पंच विजय मनोहर नाक्ती याला मौजे विरझोली येथील आरोपीचे घर क्र.१७६ चे मागे पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते, त्या ठिकाणी पोलीसांना आरोपीचे ताब्यातील ०२ प्लास्टीक कॅनमध्ये एकूण ३० लि. गावठी हातभट्टीची दारू मिळाली होती, सदर मुद्देमालातून १८० मि.लि.दारू सी.ए.परिक्षणाकरीता वेगळी काढली व त्याचा पंचनामा केला, त्यावर मी वाचून सही केली.

०३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझे गावातील रहिवासी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याला वाचविण्याकरीता आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. पी. दांडेकर यांनी नाकारला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

sunil sakharam mahale
Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.07.18 18:21:40 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.१८.०७.२०२३ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.